# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/ D90526

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 03/11/2017

## परिपत्रक

**विषय:- भूखंड विकसित करण्यासाठी मुदतवाढ देण्याच्या धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत....(तिसरी मुदतवाढ देणे)**

वाचावे:- १. परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ए७१२२२ दिनांक ०६.०३.२०१३
२. परिपत्रक क्र.मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/बी२५७८५ दिनांक २९.०४.२०१४
३. परिपत्रक क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग/१५३/२०१२ दिनांक २७.०४.२०१२
४. परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/२५९६६ दिनांक २२.०१.२०१३
५. परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/बी ७३८६४ दिनांक १०.०६.२०१३

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील अविकसित भूखंडाच्या विकासाकरीता सुधारीत मुदतवाढ धोरण दि. ०६.०३.२०१३ आणि दि. २९.०४.२०१४ तसेच प्राधान्य आणि उद्योग विस्तार सदराखाली वाटप केलेल्या भूखंडासाठी महामंडळाच्या दि. २७.०४.२०१२ आणि दि. २२.०१.२०१३ च्या उपरोक्त परिपत्रकानुसार भूखंडाच्या विहित विकास कालावधीनंतर दोन मुदतवाढी देण्याचे धोरण निर्गमित करण्यात आहे. त्यानंतर मुदतवाढ देण्याचे धोरण नसल्याने अशा भूखंडांसाठी पुढील तीसरी मुदतवाढ देण्याबाबतचा धोरणात्मक प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या दि. २१.०६.२०१७ रोजीच्या ३७१ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ५६८२ पारित करण्यात आला आहे. सदर ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे-

(१) महामंडळाच्या दि. ०६.०३.२०१३ च्या परिपत्रकाप्रमाणे पहिली मुदतवाढ १० टक्के (ड व ड+ प्रभागाकरीता)/२५ टक्के (अ, ब व क प्रभागाकरीता) आणि दुसरी मुदतवाढ १० टक्के (ड व ड+ प्रभागाकरीता)/४० टक्के (अ, ब व क प्रभागाकरीता) ना परतीची अतिरिक्त रक्कम भरण्याच्या अटीवर मंजूरीचे धोरण यापुढेही कायम राहिल.

(२) दि. २२.०१.२०१३ च्या परिपत्रकानुसार प्राधान्य सदराखाली तसेच उद्योग विस्ताराकरीता वाटप केलेल्या भूखंडासाठी दोन वर्षांचा विहित कालावधीनंतर दोन मुदतवाढी अनुक्रमे २५ टक्के आणि ५० टक्के ना परतीची अतिरिक्त रक्कम आकारुन देण्याचे धोरण यापुढेही कायम राहिल.

(३) उपरोक्त दोन मुदतवाढीच्या कालावधीमध्ये भूखंड विकासासाठी केलेली परिणामकारक कार्यवाही आणि नकाशे मंजूरीनुसार किमान ५० टक्के बांधकाम झाले असल्यास (बांधकामाच्या प्रगतीबाबत

विशेष नियोजन प्राधिकारी/प्रादेशिक अधिकारी यांचा स्थळ पहाणीचा वस्तुनिष्ठ अहवाल बांधकामाबाबतच्या छायाचित्रासह घेऊन) सक्षम प्राधिकारी यांच्या मंजूरीने दोन मुदतवाढीनंतरची पुढील एक वर्षाची मुदतवाढ ५ टक्के ना परतीची अतिरिक्त रक्कम वसुल करुन देण्यात यावी.

(४) तीन मुदतवाढ घेऊन (धोरणाप्रमाणे २ आणि त्यानंतर वरील प्रमाणे १ याप्रमाणे) बांधकाम पूर्ण केले असेल परंतु इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केला नसेल तर अशा अपवादात्मक प्रकरणात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्वमान्यतेने पुढील एक वर्षाची मुदतवाढ ५ टक्के ना परतीची अतिरिक्त रक्कम वसुल करुन देण्यात यावी. सदर मुदतवाढीच्या कालावधीमध्ये भूखंडावर इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादनात जाणे बंधनकारक राहील.

(५) सदरचे धोरण महामंडळाने वाटप केलेले सर्व प्रकारचे भूखंड, प्राधान्य सदराखाली तसेच उद्योग विस्ताराकरीता वाटप केलेले भूखंड त्याचबरोबर सर्व प्रकारे हस्तांतर होऊन आलेले भूखंड यांचेकरीता लागू राहिल.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने व विधी व कामकाज विभागाचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.